# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


### प्रेस नोट

दिनांक 09/03/2021 (मंगळवार)

(दुपार)

---

### जागतीक महिला दिनानिमीत्त
### नागपूर जिल्हा (ग्रामीण) येथे घेण्यात आलेले कार्यक्रम

नागपूर जिल्हा (ग्रामीण) चे पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला व अपर पोलीस अधिक्षक श्री राहुल माकणीकर यांचे मार्गदर्शनात पोलिस अधिक्षक कार्यालय नागपूर ग्रामीण येथे दिनांक 08/03/2021 रोजी जागतीक महिला दिनानिमीत्त कार्यक्रम राबविण्यात आला आहे.. त्याअनुषंगाने नागपूर ग्रामीण जिल्हा अंतर्गत असलेले पोलिस स्टेशन तसेच पोलिस अधिक्षक कार्यालय येथील शाखेतील महिला पोलिस अधिकारी, महिला पोलिस अमलदार व मंत्रालयीन महिला स्टाफ यांना त्यांनी पोलिस दलात केलेल्या उल्लेखनिय कामगिरी संबंधाने मा. पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला यांच्या शुभहस्ते पुष्पगुच्छ व सन्मान पत्र देवून त्यांनी केलेल्या कामाची प्रशंसा करून त्यांचा गौरव करण्यात आलेला आहे. तसेच कार्यक्रमात उपस्थित असलेल्या सर्व महिलांना पोलीस अधीक्षक यांनी त्यांना सन्मान पत्र देवून पुढील भविष्यात सुद्धा आपण अति उत्कृष्ट कामगिरी करावी अशी अपेक्षा बाळगुन मोलाचे मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. नागपूर ग्रामीण येथील सर्व महिला पोलिस अमलदार यांना मा. गृहमंत्री यांचे प्राप्त झालेले शुभेच्छा पत्राचे त्यांना वाटप करण्यात आले आहे. सदर कार्यक्रमाचे संचालन महिला पोलिस अमलदार पल्लवी रेहपाडे हिने केले असून आभार प्रर्दशन पोलिस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांनी केले.

या कार्यक्रमाला अपर पोलीस अधीक्षक श्री. राहुल माकणीकर, उप पोलीस अधीक्षक (गृह) श्री. संजय पुरंदरे, उवविभागीय पोलिस अधिकारी रामटेक विभाग येथील श्रीमती नयन आलुरकर, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार, जिल्हा विशेष शाखा येथील पोनि श्री. मधुकर गिते तसेच शाखेतील व मंत्रालयीन स्टाफ उपस्थित होते.







पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर